ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखालील विद्युत निरीक्षणालयातील अधिसंख्य पदावरील नियुक्त्यांना मुदतवाढ देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
शासन निर्णय क्र. मुविनि-२०२२/प्र. क्र.१९३/ऊर्जा-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक : २१ जुलै, २०२६.

संदर्भ: (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दि. २१ डिसेंबर, २०१९.
(२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-२०२०/प्र.क्र.१८७ अे/१६-ब, दि. ३० जून, २०२०.
(३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. मुविनि-२०१९/प्र.क्र. १६५/ऊर्जा-५, दि. ०४ ऑक्टोबर, २०२१.
(४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१९/प्र.क्र.५८१ ए/१६-ब, दि. १४ डिसेंबर, २०२२.
(५) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. मुविनि-२०२२/प्र.क्र. १९३/ऊर्जा-१, दि. ११ जुलै, २०२५.
(६) मुख्य विद्युत निरीक्षक ,मुंबई यांचे पत्र क्र. मुविनि/आस्थापना/१(२/६६९/२०२६, दि.१५ मे, २०२६ रोजीचे पत्र.

प्रस्तावनाः-

मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे अनुसूचित जमातीचे जातीदावे अवैध ठरल्यामुळे त्यांच्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदे निर्माण करुन ११ महिन्यांकरीता किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर नेमणूक देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखालील विद्युत निरीक्षणालयातील अनुसूचित जमाती प्रवर्गातून नियुक्त झालेल्या तथापि, जात वैधता प्रमाणपत्र सादर करू न शकलेल्या ०६ अधिकारी/ कर्मचारी यांची संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णय, दि.०४.१०.२०२१ अन्वये अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आली आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र. ५ अन्वये अधिसंख्य अधिकारी / कर्मचाऱ्यांपैकी ०१ कर्मचारी दि.३१.०५.२०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्याने उर्वरित ०५ अधिसंख्य पदांना ११ महिन्याच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदत **दि. ०६.०५.२०२६** रोजी संपुष्टात आल्यामुळे सदर अधिसंख्य पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>:-

ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखालील विद्युत निरीक्षणालयातील संदर्भाधीन क्र. ३ येथील दि.०४.१०.२०२१ च्या शासन निर्णयान्वये अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांपैकी ०१ कर्मचारी दि.३१.०५.२०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने उर्वरित ०५ अधिसंख्य पदावरील नियुक्त्यांना १ दिवसाचा तांत्रिक खंड विचारात घेवून **दि.०८.०५.२०२६ ते दि. ०७.०४.२०२७** पर्यंत म्हणजेच ११ महिन्यासाठी किंवा ते सेवेत राहिले असते तर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभागाचा दि.१४.१२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२६०७२११४५८५४४०५३ असा आहे. हा निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

AVINASH RAJESH ATKAD

Digitally signed by AVINASH RAJESH ATKAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=IELMD, 2.5.4.20=F772EE0A28E62B88C18153A71C018DB8CA85BB88519F9C9732879CD03483D005, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7DFB83DE598E6DA39C6F3759E6943FB264003EB8BAFCBA24102A6D87367C3EA1, cn=AVINASH RAJESH ATKAD
Date: 2026.07.21 15:00:46 +05'30'

(अविनाश रा. आतकड)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री (ऊर्जा) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. महालेखापाल-१/२, (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
४. अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अप्पर मुख्य सचिव (ऊर्जा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७. मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, चेंबुर (पू.), मुंबई.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/निवासी लेखाधिकारी, मुंबई.
९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१०. अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, मुंबई/पुणे/छ. संभाजीनगर /नागपूर.
११. सहसचिव (ऊर्जा-१) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१२. निवड नस्ती/ऊर्जा-१.